लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग रस्त्यांची प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग

शासन निर्णय क्रमांकः रवियो-२०२३/प्र.क्र.१८/नियोजन-२

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक- १९ जून, २०२६

पहावे :- १) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नांदेड यांचे पत्र
जा.क्र./मु.अ. नां/प्र.आ./२८३, दि.१३/०१/२०२३.

प्रस्तावना :-

मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नांदेड यांनी संदर्भाधिन पत्रान्वये लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग रस्त्यांची प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नती करणेबाबत प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. तसेच जिल्हा परिषद, लातूर यांनी सदर रस्ते दर्जोन्नत करणेबाबतचा ठराव केलेला आहे.

सदर रस्त्यांवरील गावांची संख्या, लोकसंख्या, रस्त्यांचा होणारा वापर तसेच जिल्हा परिषद, लातूर यांचा ठराव विचारात घेता, सदर रस्ते प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :-

मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नांदेड यांचा प्रस्ताव व जिल्हा परिषद, लातूर यांचा ठराव विचारात घेऊन लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील खालील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | प्रस्तावित रस्त्याचे नांव | सामाविष्ट रस्त्याचा क्रमांक | साखळी क्रमांक व लांबी | दर्जोन्नत करावयाची एकूण लांबी (कि.मी.) | दर्जोन्नती नंतरचा क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ३. | रामा-६८ ते शिवली-भादा-उटी (बु.) रस्ता. ता. औसा. | इतर जिल्हा मार्ग- १२० | (०/०० ते ७/५००) ७.५०० कि.मी | १०.५०० कि.मी. | प्रमुख जिल्हा मार्ग-११९ |
| | | ग्रामीण मार्ग-१३३ | (०/००ते ३/००) ३.०० कि.मी | | |
| ४. | रामा-२३९ ते काळमाथा-उटी (बु.) लखनगाव-सतधरवाडी- राममा-२४२ रस्ता. ता. औसा. | इतर जिल्हा मार्ग- १२२ | (०/०० ते १०/००) १०.०० कि.मी | १५.०० कि.मी. | प्रमुख जिल्हा मार्ग-१२० |
| | | प्रजिमा क्र.१०७ मधील १.५०० कि.मी. ओवहरलॅप लांबी. | | | |
| | | इतर जिल्हा मार्ग- ९९ चा भाग | (०/०० ते ५/००) ५.०० कि.मी | | |
| ५. | राममा-३६१ (औसा)-वानवाड-तुंगी (बु.)-मसलगा (खु.)-माळकोंडजी (पु.) -प्रजिमा-५३ ते रामा-२३८ हसलगन (पु.) रस्ता. ता. औसा. | इतर जिल्हा मार्ग १०५ चा पूर्ण भाग | (०/०० ते १५/००) १५.०० कि.मी | १५.०० कि.मी. | प्रमुख जिल्हा मार्ग-१२१ |
| ६. | नागरसोगा ते चिंचोली तपसे-चिंचोली वाडी (पु.) ते प्रजिमा-५४ किल्लारी जुने पर्यंत रस्ता. ता. औसा. | इतर जिल्हा मार्ग- १०४ | (०/०० ते १८/००) १८.०० कि.मी | १८.०० कि.मी. | प्रमुख जिल्हा मार्ग-१२२ |
| ८. | राममा-३६१ लातूर-इजिमा-१२४-कातपूर-जगन्नाथपूर-प्रजिमा-५९ ते (शिरसी ता. लातूर) हिप्परसोगा-हसेगांव-गोंद्री ते राममा-७५२ के पर्यंत रस्ता. ता. लातूर व औसा. | इतर जिल्हा मार्ग-१५ (ता. लातूर) | (०/०० ते ६/६००) ६.६०० कि.मी. | १५.९०० कि.मी. | प्रमुख जिल्हा मार्ग-१२३ |
| | | इतर जिल्हा मार्ग-११६ (ता. औसा) | (०/००ते ९/३००) ९.३०० कि.मी. | | |
| | **एकूण** | | | **७४.४०० कि.मी.** | |

परिणामी रस्ते विकास योजना २००१-२०२१ मधील लातूर जिल्ह्यातील प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांच्या एकूण लांबीत **७४.४०० कि.मी.** ने वाढ होवून एकूण लांबी (२३२१.८७५ + ७४.४००) म्हणजेच **२३९६.२७५ कि.मी.** इतकी व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांच्या एकूण लांबीत **७१.४०० कि.मी.** ने घट होवून एकूण लांबी ( १०२०.७००- ७१.४००) म्हणजेच **९४९.३०० कि.मी.** इतकी होईल. तसेच ग्रामीण मार्ग रस्त्यांच्या एकूण लांबी **३.००** **कि.मी.** ने घट होवून एकूण लांबी ( ३५४७.६६०-३.००) म्हणजेच **३५४४.६६० कि.मी.** इतकी होईल.

सदर दर्जोन्नती खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

(१) दर्जोन्नत लांबीमध्ये कोणतेही नवीन काम करण्यापूर्वी, संपूर्ण लांबीची आवश्यक ती रुंदी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नावे असल्याची खातरजमा संबंधीत मुख्य अभियंता, यांनी व्यक्तिश: करावी व तसे सर्व कागदपत्रांसह अभिलेख्यांमध्ये समाविष्ट करण्यात यावे.

(२) भविष्यात भूसंपादनाची कोणतीही तक्रार, न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास, त्यास संबंधीत मुख्य अभियंता यांना जबाबदार धरण्यात येईल.

(३) प्रस्तावित रस्त्यावरील ज्या लांबीमध्ये प्रधानमंत्री / मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये कामे मंजूर आहेत अथवा दोष दायित्व कालावधीमध्ये आहेत अशा लांबीवर सदर योजनेचा कालावधी पूर्ण झाल्याशिवाय सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कामे प्रस्तावित करण्यात येणार नाहीत.

(४) उपरोक्त अटींची पूर्तता केल्याशिवाय कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०६१९१०३०२३६११८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by AJIT DATTATRAYA KATKAR
Date: 2026.06.19 10:31:17 +05'30'

**( अजित काटकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर.

२) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नांदेड. (यांनी सदर शासन निर्णयानुसार रस्ते विकास योजना २००१-२०२१ च्या रस्ते सूचीमध्ये नोंद घ्यावी व नकाशामध्ये बदल करुन जिल्ह्याच्या संकेतस्थळी प्रसिध्द करावा. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा)

३) अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, लातूर. (यांनी सदर शासन निर्णयानुसार रस्ते विकास योजना २००१-२०२१ च्या रस्ते सूचीमध्ये नोंद घ्यावी व नकाशामध्ये बदल करुन जिल्ह्याच्या संकेतस्थळी प्रसिध्द करावा. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा.)

**प्रत :-**

१) उप सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई

२) जिल्हाधिकारी, लातूर.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर.

४) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर.

५) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

६) रेखाचित्र शाखा, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय.

७) रस्ते विकास योजना २००१-२०२१ ची नस्ती.

८) निवडनस्ती.